दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ०९ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २२३ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


## आजचे पंचांग

शनिवार दि. ९ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, सप्तमी दुपारी २-०३ पर्यंत नंतर अष्टमी तिथी, दिवस नक्षत्र- श्रवण रात्री ११-२५ पर्यंत नंतर धनिष्ठा, चंद्र रास - मकर, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

## सहा अल्पवयीन मुली बेपत्ता

**मुंबई:** अल्पवयीन मुलींच्या अत्याचाराच्या घटनांनी पुणे जिल्हा हादरुन गेला आहे. नसरापूरमधील चिमुकलीचे अत्याचार आणि हत्या प्रकरण ताजे असतानाच पुण्यात आजोबानेच नातीचे शोषण केल्याचे समोर आले आहे. एकीकडे अत्याचार प्रकरणे वाढत असतानाच पुण्यात दोन दिवसात सहा अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. दोन दिवसांत सहा अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. बेपत्ता झालेल्या सर्व मुली १५ ते १७ वयोगटातील आहेत.

## सारांश वृत्त

### राजधानी दिल्लीत पारा वाढला

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय राजधानीत उष्णतेच्या लाटेपासून दिलासा मिळाल्यानंतर शुक्रवारी शहरात तापमानात वाढ झाली आणि सफदरजंग स्थानकात ३६.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, असे भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) सांगितले. पालम येथे दिवसाचे तापमान ३४.४ अंश सेल्सिअस नोंदले गेले. लोदी रोड आणि रिज येथे अनुक्रमे ३४.२ आणि ३४.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

### सीईओवर लैंगिक शोषणाचा आरोप

**नवी दिल्ली :** एका खासगी डिजिटल मार्केटिंग कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्याविरोधात एका माजी इंटर्नने लैंगिक छळ आणि धमकावल्याची तक्रार दाखल केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सांगितले की, या महिलेने सीईओवर दक्षिण दिल्लीत कंपनीत इंटर्नशिप दरम्यान अनुचित वर्तन, मानसिक छळ आणि प्रतिकूल कामाचे वातावरण तयार केल्याचा आरोप केला. आरोपींनी तिला धमकावले आणि वारंवार गैरवर्तन केले, ज्यामुळे तिला पोलिसांकडे जावे लागले, असा आरोपही तक्रारदाराने केला.

### वीज कोसळून सात जणांचा मृत्यू

**पाटणा :** बिहारमध्ये मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे वीज कोसळून सात जणांचा मृत्यू झाला आहे. भोजपूर, पाटणा, समस्तीपूर आणि पूर्व चंपारण येथे प्रत्येकी एका व्यक्तीचा वीज कोसळून मृत्यू झाला, तर पाटणा येथे दोन आणि वैशालीमध्ये एकाचा झाड कोसळून मृत्यू झाला. मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी मृतांच्या कुटुंबीयांना ४ लाख रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली.

## शुभेंदू अधिकारी नवे मुख्यमंत्री; अमित शाह यांनी केली घोषणा

# पश्चिम बंगालमध्ये आता 'दादा' पर्व!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या ऐतिहासिक विजयानंतर अखेर मुख्यमंत्रीपदाचा चेहरा स्पष्ट झाला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी शुभेंदू अधिकारी यांच्या नावाची घोषणा केली. त्यामुळे पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री म्हणून शुभेंदू अधिकारी यांची निवड निश्चित झाली आहे.

पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक अमित शाह यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीनंतर त्यांनी शुभेंदू अधिकारी यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली. भाजपने विधानसभा निवडणुकीत २९४ पैकी २०७ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले आहे.

अमित शाह म्हणाले की, "विधिमंडळ नेते निवडीसाठी जवळपास आठ प्रस्ताव आले, मात्र सर्व प्रस्तावांमध्ये एकाच नावाचा उल्लेख होता. दुसऱ्या नावासाठी पुरेसा वेळ देण्यात आला, पण कोणतेही अन्य नाव पुढे आले नाही. त्यामुळे केंद्रीय निरीक्षक म्हणून मी शुभेंदू अधिकारी यांना पश्चिम बंगाल भाजप विधिमंडळ पक्षाचे नेते घोषित करतो." या घोषणेनंतर बैठकीत उपस्थित आमदारांनी जल्लोष करत घोषणाबाजी केली. यावेळी शाह यांनी पश्चिम बंगालच्या जनतेचे आभार मानले. "रामकृष्ण ठाकूर, महर्षी अरविंद, स्वामी विवेकानंद आणि रवींद्रनाथ टागोर यांच्या विचारांचा बंगाल निर्माण करण्यासाठी आम्ही काम करू," असेही त्यांनी सांगितले. अमित शाह यांनी या विजयाला ऐतिहासिक आणि वैचारिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे संबोधले. "श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या विचारांनी १९५० मध्ये सुरू झालेला प्रवास आता २०२६ मध्ये पश्चिम बंगालमध्ये सरकार स्थापनेपर्यंत पोहोचला आहे," असे ते म्हणाले.

सुवेंद्रु अधिकारी यांच्या मंत्रिमंडळामध्ये आता कोण कोण असणार, याची चर्चा रंगली आहे. पश्चिम बंगालमध्ये महाराष्ट्राचा पॅटर्न राबवला जाणार आहे. बंगालमध्येही २ उपमुख्यमंत्री असणार आहे. त्यांचा नावावर अद्याप शिक्कामोर्तब केलं नाही, पण लवकरच नाव समोर येणारा आहे. शनिवारी ९ मे रोजी सुवेंद्रु अधिकारी हे मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहे. त्यांच्यासोबत भाजपचे इतर मंत्रीही शपथ घेणार आहे. कोलकत्यामधील ऐतिहासिक अशा ब्रिगेड मैदानात शपथविधी सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह देशभरातील भाजपच्या मुख्यमंत्र्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. एनडीएच्या घटक पक्षाच्या नेत्यांना देखील निमंत्रित करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खा. प्रफुल्ल पटेल उपस्थित राहणार आहेत.

## द्रमुक-काँग्रेस आघाडीत फूट?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** द्रविड मुनेत्र कळघम आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्यातील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. द्रमुक नेत्या कनिमोळी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून लोकसभेतील द्रमुक खासदारांची बैठक व्यवस्था बदलण्याची मागणी केली आहे.

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर द्रमुक आणि काँग्रेसमधील मतभेद उघडपणे समोर येऊ लागले आहेत. विधानसभा निवडणुकीत द्रमुक आणि काँग्रेसने एकत्र निवडणूक लढवली होती. मात्र, निवडणुकीत एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुकला मोठा पराभव स्वीकारावा लागला. त्यानंतर काँग्रेसने अभिनेता-राजकारणी थलपती विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. यामुळे द्रमुकमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे दिसत आहे. कनिमोळी यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, "सध्याच्या राजकीय परिस्थितीत काँग्रेससोबतची आघाडी संपुष्टात आली आहे. त्यामुळे लोकसभेत काँग्रेस खासदारांसोबत बसणे योग्य ठरणार नाही. द्रमुक खासदारांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात यावी."

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत २३४ पैकी द्रमुकला ५९ जागांवर विजय मिळाला, तर टीव्हीकेने १०८ जागा जिंकत मोठा धक्का दिला. अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम ला ४७ जागा मिळाल्या. काँग्रेसला ५, पीएमकेला ४, माकप आणि भाकपला २ जागा मिळाल्या. टीव्हीकेला पाठिंबा वाढताना दिसत आहे. काँग्रेस नंतर माकपच्या दोन आमदारांनीही समर्थन जाहीर केले आहे.

## जिल्हा बँकेतील ७० टक्के नोकऱ्या स्थानिकांसाठी राखीव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरतीसंदर्भात राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या बँकांमधील रिक्त पदे भरताना आता ७० टक्के जागा संबंधित जिल्ह्यातील स्थानिक उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. सहकार विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, या निर्णयामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या जिल्ह्यातच रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

राज्यात सध्या ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. या बँका प्रामुख्याने शेतकरी, विकास संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडित घटकांसोबत कार्य करतात. त्यांचे कार्यक्षेत्रही जिल्ह्यापुरते मर्यादित असते. त्यामुळे स्थानिक भौगोलिक परिस्थिती, ग्रामीण समस्या आणि बोलीभाषेची माहिती असलेल्या कर्मचाऱ्यांमुळे ग्राहकांना अधिक चांगली सेवा देता येईल, हा यामागील उद्देश आहे.

संबंधित जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेल्या आणि डोमिसाइल प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांसाठी ७० टक्के जागा राखीव राहतील. उर्वरित ३० टक्के जागांसाठी जिल्ह्याबाहेरील उमेदवार अर्ज करू शकतील. मात्र, या ३० टक्के कोट्यातून पुरेसे पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाहीत, तर त्या जागादेखील स्थानिकांमधून भरता येणार आहेत.

## एकूण निकाल ९२.०९ टक्के; विक्रमी वेळेत जाहीर

# दहावीच्या निकालात मुलींचीच बाजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडून घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला असून यंदा राज्याचा एकूण निकाल ९२.०९ टक्के लागला आहे. यावर्षीही मुलींनी निकालात बाजी मारली असून त्यांचा निकाल मुलांच्या तुलनेत ५.६० टक्क्यांनी अधिक लागला आहे. कोकण विभागाने पुन्हा एकदा राज्यात अव्वल स्थान पटकावले असून छत्रपती संभाजीनगर विभागाचा निकाल सर्वात कमी लागला आहे.

यंदाची दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत घेण्यात आली होती. राज्यातील नऊ विभागीय मंडळांतून एकूण १५ लाख ५५ हजार २६ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४ लाख ३० हजार ४६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. नियमित विद्यार्थ्यांचा निकाल ९२.०९ टक्के लागला असून खाजगी विद्यार्थ्यांचा निकाल ७६.३३ टक्के इतका नोंदवला गेला आहे. खाजगी विद्यार्थ्यांची एकूण नोंदणी २९ हजार ५०६ इतकी होती, त्यापैकी २२ हजार ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण मिळून १४ लाख ५२ हजार १४६ विद्यार्थी यंदाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

यंदाही मुलींनी निकालात आघाडी कायम ठेवली आहे. मुलींचा निकाल ९४.१६ टक्के लागला असून मुलांचा निकाल ८९.५६ टक्के आहे. त्यामुळे मुलींचा निकाल मुलांपेक्षा ५.६० टक्क्यांनी अधिक ठरला आहे. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यंदा १० हजार ३१ दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९ हजार ४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षेदरम्यान राज्यभरात एकूण ४०२ कॉपी प्रकरणे आढळली असून सर्वाधिक ८२ प्रकरणे नाशिक विभागात नोंदवण्यात आली आहेत.

विभागनिहाय निकालात कोकण विभागाने ९७.६१ टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यापाठोपाठ मुंबई विभागाचा निकाल ९४.९७ टक्के, कोल्हापूर विभागाचा ९४.४७ टक्के आणि पुणे विभागाचा ९४.१४ टक्के लागला आहे. नागपूर विभागाचा निकाल ९०.७७ टक्के, नाशिक विभागाचा ९०.५३ टक्के आणि अमरावती विभागाचा ९०.५० टक्के इतका आहे. लातूर विभागाचा निकाल ८८.४२ टक्के तर छत्रपती संभाजीनगर विभागाचा निकाल सर्वात कमी ८८.४१ टक्के लागला आहे.

गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र बोर्डाकडून दहावी आणि बारावीचे निकाल विक्रमी वेळेत जाहीर करण्याची परंपरा कायम ठेवण्यात आली आहे. बारावीनंतर आता दहावीचाही निकाल वेळेत जाहीर झाल्याने अकरावी प्रवेश प्रक्रिया आणि पुढील शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू होण्यास मदत होणार आहे.

## १२ क्विंटल कांदा विकला, हातात एक रुपयाही नाही

# शेतकऱ्यालाच भरावा लागला एक रुपया

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजीनगर** : अवकाळी पाऊस, वाढते उत्पादन खर्च आणि बाजारातील घसरलेले दर यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची अवस्था किती बिकट झाली आहे, याचे संतापजनक उदाहरण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात समोर आले आहे. पैठण तालुक्यातील वरुडी गावातील एका शेतकऱ्याने १२६२ किलो कांदा विक्रीसाठी बाजार समितीत आणला. मात्र, कांदा विकून एक रुपयाही हातात पडला नाही. उलट बाजार खर्च वजा जाता त्या शेतकऱ्यालाच व्यापाऱ्याला एक रुपया द्यावा लागला.

राज्यात सध्या कांद्याचे दर कोसळले असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना प्रतिकिलो एक ते तीन रुपये दर मिळत आहेत. त्यामुळे शेतकरी संतप्त झाले असून विविध भागांत आंदोलनेही सुरू आहेत. वरुडी गावातील शेतकरी प्रकाश गलधर यांनी मोठ्या आशेने १२ क्विंटल कांदा विक्रीसाठी बाजार समितीत आणला होता. मेहनत, खर्च आणि कर्ज याचा भार सहन करत पिकवलेल्या कांद्याला चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात त्यांच्या पदरी प्रचंड निराशा आली.

प्रकाश गलधर यांनी सांगितले की, "१२ क्विंटल कांदा विकण्यासाठी बाजारात आणला. पण हमाली, तोलाई, भाडे आणि इतर खर्च वजा जाता हातात एक रुपयाही आला नाही. उलट एक रुपया स्वतःच्या खिशातून भरावा लागला. मुलीच्या लग्नासाठी पाच-सहा लाखांचे कर्ज आहे. पैसे मिळतील या आशेने कांदा विकायला आणला होता. चांगल्या कांद्याला तीन-चार रुपये भाव मिळतोय. एवढ्या कमी दरात शेती करायची कशी?" असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

प्रकाश गलधर यांनी विक्रीसाठी आणलेल्या १२६२ किलो कांद्याला एकूण १२६२ रुपये दर मिळाला. मात्र त्यामधून हमाली १२५ रुपये, तोलाई खर्च ३८ रुपये, भराई २५ रुपये, वाराई २५ रुपये, गोणी खर्च ५५० रुपये आणि वाहतूक भाडे ५०० रुपये असा एकूण १२६३ रुपयांचा खर्च वजा करण्यात आला. त्यामुळे एक रुपया तोटा झाला आणि शेतकऱ्यालाच तो भरावा लागला.

ही घटना राज्यातील कृषी व्यवस्थेवर आणि कांद्याच्या कोसळलेल्या बाजारभावावर प्रश्न उपस्थित करणारी ठरली आहे. कष्टाने पिकवलेल्या मालालाच भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

## जिल्हाधिकारी पाठकला ७ दिवसांची कोठडी

**बीड :** बीड- धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनातील वाढीव मोबदल्याच्या १५४ प्रकरणात २४१ कोटी ६२ लाख रुपयांच्या घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक याला बीड पोलिसांनी गुरुवारी अटक केली. शुक्रवारी पाठक यांना बीड न्यायालयात हजर केले असता, त्यांना १५ मे पर्यंत म्हणजेच सात दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या प्रकरणात ७२ कोटी रुपयांचा वाढीव मोबदला वाटप करुन या प्रकरणातील कागदपत्रांमध्ये अविनाश पाठक यांच्या स्वाक्षरीबाबतचे अहवाल तपासल्यानंतर त्यांना चौकशीसाठी लातूरहून ताब्यात घेण्यात आले होते.

## चिमुरड्यांच्या संरक्षणाचे काय?

### उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : "लाडक्या बहिणींना पैसे देता, मग चिमुरड्यांच्या संरक्षणाचे काय?" अशा कठोर शब्दांत मुंबई उच्च न्यायालय यांनी राज्य सरकारच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. लातूर येथील एका बालगृहातील कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने सरकारला खडेबोल सुनावत, मुलांची सुरक्षा वाऱ्यावर सोडणे ही कायद्याची पायमल्ली असल्याचे स्पष्ट केले.

राज्य सरकार एकीकडे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसारख्या योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करत असताना, दुसरीकडे समाजातील सर्वात दुर्बल घटक असलेल्या बालकांच्या संरक्षण आणि संगोपनाकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल न्यायालयाने संताप व्यक्त केला. "निधीचे वाटप करताना संविधानातील समानतेच्या तत्त्वाचा विसर पडू देऊ नका," अशा शब्दांत न्यायालयाने ताशेरे ओढले. लातूरमधील एका बालगृहातील कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेत बालगृहांना पुरेसे अनुदान आणि कर्मचाऱ्यांना योग्य वेतन देण्याची मागणी करण्यात आली होती. सुनावणीदरम्यान सरकारकडून सध्या एका मुलामागे २ हजार रुपयांचे अनुदान दिले जात असल्याची माहिती समोर आली. त्यापैकी १५०० रुपये संगोपनासाठी तर ५०० रुपये प्रशासकीय खर्चासाठी वापरले जातात. ही रक्कम अत्यंत अपुरी असल्याचे नमूद करत न्यायालयाने ती थट्टा असल्याचे म्हटले. बालकांच्या अन्न, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षेसाठी इतक्या कमी निधीत व्यवस्था चालवणे अशक्य असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले. मुलांचे संरक्षण आणि कल्याण ही राज्य सरकारची सर्वोच्च घटनात्मक जबाबदारी आहे, असेही न्यायालयाने म्हटले.

## महाराष्ट्रातील उद्योग अडचणीत

# वीजदरवाढ, सौर ऊर्जेवरील करांचा बोजा वाढला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्यातील वाढते वीजदर, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे निर्माण झालेली इंधन टंचाई आणि अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांचा परिणाम यामुळे महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. उद्योग क्षेत्राची अवस्था "आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना" अशी झाल्याची भावना उद्योजकांकडून व्यक्त होत आहे.

राज्यातील भरमसाठ वीजदर आणि सातत्याने होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्यामुळे अनेक उद्योगांनी सौर ऊर्जेकडे वळण्याचा निर्णय घेतला होता. राज्य सरकारच्या हरित ऊर्जा धोरणाला प्रतिसाद देत उद्योगांनी मोठ्या प्रमाणात कर्ज काढून सौर ऊर्जा प्रकल्प उभारले. मात्र आता महावितरणकडून अतिरिक्त शुल्क आकारणी सुरू झाल्याने उद्योग क्षेत्रात तीव्र नाराजी पसरली आहे. ग्रीड सपोर्ट चार्जेस, फिक्स चार्जेस, टॅक्स ऑन सेल आणि व्हिलिंग चार्जेसमध्ये वाढ करण्यात आल्याने उद्योगांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. २५ मार्च २०२६ रोजी वीज नियामक आयोगाने जारी केलेल्या आदेशानुसार एप्रिलपासून या नव्या शुल्कांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. विशेषतः स्वतः गुंतवणूक करून उभारलेल्या सौर प्रकल्पांवरही अतिरिक्त ग्रीड चार्जेस लावण्यात आल्याने उद्योगांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. रविवारी कोल्हापुरात जिल्हाधिकारी कार्यालयात महावितरण आणि उद्योजकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील उद्योजकांनी महावितरण अधिकाऱ्यांवर प्रश्नांचा भडिमार केला. मात्र, कोणत्याही प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली नसल्याचा आरोप उद्योग प्रतिनिधींनी केला. उद्योजकांचे म्हणणे आहे की, शासनाच्या आवाहनानुसार त्यांनी स्वतःच्या जागेत, स्वतःच्या भांडवलातून आणि बँक कर्जाच्या मदतीने सौर प्रकल्प उभारले. वीज निर्मितीही स्वतः करत असताना महावितरणकडून अतिरिक्त शुल्क आकारणे ही "दादागिरी" असल्याची भावना उद्योगांमध्ये आहे. त्यामुळे आता कोल्हापूर, सांगली आणि सातारा येथील औद्योगिक संघटना आणि ओपन अॅक्सेस वीज ग्राहक दिल्लीतील वीज लवादाकडे दाद मागण्याच्या तयारीत आहेत. "टॅक्स ऑन सेल" व्यतिरिक्त आता वीज निर्मितीवरही कर आकारला जात असल्याने सौर ऊर्जा उत्पादकांमध्ये असंतोष वाढला आहे. व्हिलिंग चार्जेसमध्येही वाढ करण्यात आली असून हे शुल्क ओपन अॅक्सेस आणि कॅप्टिव्ह पॉवर वापरणाऱ्या उद्योगांच्या बिलांमध्ये आकारले जात आहे. त्यामुळे "सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय चुकीचा ठरला का?" असा प्रश्न उद्योग क्षेत्रात उपस्थित होत आहे.

फिक्स चार्जेसमध्ये झालेल्या वाढीमुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. उद्योग प्रतिनिधींनी २५ मार्च २०२६ चा वीजदरवाढीचा आदेश मागे घेण्याची मागणी सातत्याने केली आहे. महाराष्ट्रातील उद्योग आधीच स्पर्धात्मक दबावाखाली आहेत. अशा परिस्थितीत वाढते वीजदर आणि अतिरिक्त कर उद्योगांना राज्याबाहेर स्थलांतर करण्यास भाग पाडू शकतात.

## टीसीएस लैंगिक अत्याचार प्रकरणाला राजकीय वळण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक** : येथील टीसीएस कंपनीतील लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी निदा खान हिला पोलिसांनी अटक केल्यानंतर, या प्रकरणाला राजकीय वळण लागले आहे. २७ दिवस फरार असलेल्या निदा खानला नाशिक पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर पोलिसांच्या मदतीने अटक केली. त्यानंतर संजय शिरसाट यांनी इम्तियाज जलील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

शिवसेनेचे नेते आणि पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आरोप केला की, "इम्तियाज जलील यांनीच निदा खानला मदत केली आणि तिला लपवण्यात त्यांचा हात होता." या आरोपांनंतर राजकीय वातावरण तापले असून जलील यांनीही तात्काळ प्रतिक्रिया दिली आहे.

इम्तियाज जलील म्हणाले, "पालकमंत्र्यांनी आरोप केले म्हणून मी गुन्हेगार ठरत नाही. मी त्यांना काडीमात्र भाव देत नाही. पोलिसांनी एफआयआर दाखल केला असेल तर त्यामध्ये काहीतरी तथ्य असेल. पोलिसांनी विचारलेले सर्व प्रश्नांना मी सहकार्य करणार आहे. निदा खानविरोधात दाखल झालेला एफआयआर वाचला तर त्यात तिची भूमिका काय आहे, हे स्पष्ट दिसेल. जर तिची चूक असेल तर मी तिच्या पाठीशी उभा राहणार नाही. पण ती निर्दोष असेल तर आम्ही पूर्ण ताकदीने तिच्या पाठीशी उभे राहू. शेवटी न्यायप्रणालीवर आमचा विश्वास आहे."

निदा खानच्या अटकेनंतर आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय

# लोकशाहीचा 'नायगन', बंगालचा 'रक्तपात' आणि राज्यपालांचा कस



**पाच राज्यांच्या निवडणुकीचा धुरळा आता खाली बसला असला, तरी बंगालमधील लोकशाहीचा पराभव आणि तमिळनाडूतील सत्तेचा पेच पाहता, भारतीय लोकशाहीच्या रंगमंचावर सध्या जे नाट्यप्रयोग सुरू आहेत, ते चिंतेत टाकणारे आणि विदारक आहेत..**

भारताच्या राजकारणात 'सत्ता' हे एक असे रसायन आहे की, जे कधी कुणाला नम्र करते, तर कधी कुणाला अहंकाराच्या शिखरावर नेऊन बसवते. नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल पाहता, ईशान्येतील आसाम, दक्षिणेतील केरळ आणि पुदुच्चेरी येथील सत्तास्थापनेचा किंवा सत्तांतराचा मार्ग सुकर होताना दिसत आहे. तेथे लोकशाहीच्या संकेतानुसार प्रक्रीया पार पडतील, अशी चिन्हे आहेत. परंतु, भारताच्या पूर्व आणि दक्षिण टोकाला असलेल्या दोन मोठ्या राज्यांनी, पश्चिम बंगाल आणि तमिळनाडू यांनी जे राजकीय नाट्य उभे केले आहे, त्याने भारतीय संविधानाच्या आणि लोकशाही मूल्यांच्या मर्यादा पुन्हा एकदा चर्चेत आणल्या आहेत. सर्वात आधी बोलूया पश्चिम बंगालबद्दल. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी नावाच्या एका 'अस्सल' राजकारणी महिलेने जो खेळ मांडला आहे, तो पाहून कोणाही सुज्ञ नागरिकाच्या मनात संताप निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. निवडणुकीत जनतेने त्यांना नाकारले, त्यांचा वैयक्तिक पराभव झाला, तरीही त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास ज्या प्रकारे नकार दिला, ती लोकशाहीची थट्टाच म्हणावी लागेल. अखेर, राज्यपालांना आपल्या अधिकाराचा वापर करून त्यांना बडतर्फ करावे लागले. बंगालचा हा 'रक्तखेळ' सुरू असतानाच, दक्षिणेत तमिळनाडूमध्ये एका वेगळ्याच प्रकारच्या 'सिनेमॅटिक' नाटकाचा प्रयोग सुरू झाला आहे. विजय नामक अभिनेत्याने राजकारणात 'नायगन' म्हणून एन्ट्री घेतली. कोणत्याही चित्रपटात एक नायक असतो, एक नायिका असते आणि एक खलनायक असतो. तमिळनाडूच्या या राजकीय पटकथेत 'सत्तासुंदरी' ही नायिका असून विजय स्वतःला 'नायक' म्हणून प्रोजेक्ट करत आहे. आपली राजकीय अपरिपक्वता लपवण्यासाठी की काय, त्यांनी थेट राज्यपालांनाच 'खलनायक' म्हणून रंगवण्यास सुरुवात केली आहे. येथे तीन दिवस उलटूनही विजयला राज्यपालांच्या कायदेशीर चौकटीवर मात करता आलेली नाही. विजयला निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळालेले नाही, तरीही त्याचा पक्ष सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला आला आहे. याच बळावर त्याने सत्तास्थापनेचा दावा ठोकला. काँग्रेसने दिलेला पाठिंबा हा 'सशर्त' असल्याने, राज्यपालांनी नियमानुसार ११८ आमदारांची स्वाक्षरी असलेली यादी आणि पाठिंबा देणाऱ्या सर्व पक्षांची अधिकृत संमती पत्रे मागितली आहेत. आता यावरून राज्यपालांवर टीकेची झोड उठवली जात आहे. काही जण २०१९ च्या महाराष्ट्रातील फडणवीस-पवार शपथविधीचा दाखला देत आहेत. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांच्या सह्यांचे पत्र सादर केले होते, तेव्हाच राज्यपालांनी पाऊल उचलले होते. खरा दाखला द्यायचाच झाला, तर २०१४ चा दिला पाहिजे. त्यावेळी भाजपने सर्वात मोठा पक्ष म्हणून सत्ता स्थापन केली होती आणि राष्ट्रवादीने बाहेरून 'तोंडी' पाठिंबा जाहीर केला होता. कर्नाटकात येडियुरप्पांनी २००८ आणि २०१८ मध्ये स्पष्ट बहुमत नसतानाही सर्वात मोठ्या पक्षाचे नेते म्हणून शपथ घेतली होती. राष्ट्रीय पातळीवर १९९१ मध्ये नरसिंह राव आणि १९९६ मध्ये अटल बिहारी वाजपेयी यांनीही याच परंपरेनुसार पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. २००५ मध्ये बिहारमध्ये बुटासिंग यांनी नितीशकुमारांना संधी न देता विधानसभा बरखास्त करण्याचा जो निर्णय घेतला होता, तो आजही राज्यपालांच्या अधिकारांचा गैरवापर म्हणून ओळखला जातो. या सर्व प्रकरणांचे मर्म असे की, राज्यपालांसाठी सत्तास्थापनेचा असा कोणताही एक 'रेडिमेड' मार्गदर्शक सिद्धांत अस्तित्वात नाही. प्रत्येक राज्यपालाने त्यावेळच्या परिस्थितीनुसार आणि राजकीय स्थैर्याचा विचार करून निर्णय घेतला आहे. संविधानात याबद्दलची स्पष्टता नसल्याने, बहुमत हे केवळ राजभवनात नाही, तर विधिमंडळात सिद्ध होणे अभिप्रेत असते. कोणताही चित्रपट हा लेखकाशिवाय पूर्ण होत नाही, तसाच हा सत्तेचा खेळही काही 'अदृश्य' शक्तींच्या मदतीने चाललेला असतो. विजयने काढलेला शपथविधीचा मुहूर्त टळला आणि केलेली तयारी वाया गेली, त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, राजकारण हे डायलॉगबाजीवर चालत नाही. येथे नियमांचे आणि गणितांचे भान ठेवावे लागते. बंगालमध्ये बडतर्फ झालेली ममतांची सत्ता आणि तमिळनाडूत अडकलेला विजयचा रथ, हे भारतीय लोकशाहीतील संघर्षाचे नवे अंक आहेत. या नाट्याचा शेवट जनतेच्या हिताचा व्हावा, हीच अपेक्षा सामान्यांकडून ठेवली जात आहे.

# भारताच्या पाकिस्तान नीतीचे 'अंतिम ध्येय'

**» 'ऑपरेशन सिंदूर'च्या वर्षपूर्तीनिमित्त भारताने शत्रूच्या अण्वस्त्र धमकीचा मुखवटाही ओरबाडून काढला आहे. मात्र, केवळ प्रत्युत्तर देणे पुरेसे नसून, आता पाकिस्तान नावाच्या प्रश्नाचे 'अंतिम ध्येय' गाठण्याची वेळ आली आहे.**




आज ८ मे २०२६. बरोबर एका वर्षापूर्वी भारताने पाकिस्तानच्या कुरापतींना त्यांच्याच भाषेत उत्तर देत 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेचा यशस्वी प्रहार केला होता. २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाममध्ये पर्यटकांचे रक्त सांडणाऱ्या जिहादी मानसिकतेला भारताने अवघ्या १५ दिवसांत धूळ चारली. हा केवळ एक लष्करी विजय नव्हता, तर तो भारताच्या बदललेल्या 'डीएनए'चा पुरावा होता. 'सिंदूर' हे मंगल कार्याचे आणि शक्तीचे प्रतीक आहे; भारताने शत्रूच्या कपाळावर विजयाचा हा सिंदूर फासताना हे स्पष्ट केले की, नव्या भारताचा संयम हा दुर्बळता नसून ती एक धगधगती ज्वालामुखी आहे.

कित्येक दशकांपासून पाकिस्तानने 'न्यूक्लियर ब्लॅकमेलिंग'चे राजकारण केले. "आमच्याकडे अण्वस्त्रे आहेत," ही धमकी देऊन त्यांनी सीमेपार दहशतवादाची निर्यात केली. मात्र, ७ मे २०२५ च्या त्या पहाटे भारताने पाकिस्तानच्या सीमेत शिरून केवळ २३ मिनिटांत जे नऊ दहशतवादी अड्डे उद्‌ध्वस्त केले, त्याने हा अण्वस्त्रांचा फुगा कायमचा फोडला. भारताने स्वदेशी 'ब्रह्मोस' आणि 'आकाश' क्षेपणास्त्रांचा जो अचूक वापर केला, त्याने हे सिद्ध केले की, शत्रूच्या घरात शिरून मारण्याची ताकद आणि इच्छाशक्ती आता भारताकडे आहे. पाकिस्तानचे पाच लढाऊ विमानं आणि शंभरहून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा, ही त्या 'अंतिम ध्येया'कडे जाणारी केवळ एक पाऊलवाट होती.

आजचा पाकिस्तान आर्थिकदृष्ट्या 'व्हेंटिलेटर'वर आहे. त्यांच्याकडे ना अन्न आहे, ना दारूगोळा. अशा स्थितीत भारताने केवळ लष्करी वर्चस्व राखून चालणार नाही. 'इंडियन एक्सप्रेस'मधील लेखात म्हटल्याप्रमाणे, आता 'अंतिम ध्येय' निश्चित करण्याची वेळ आली आहे. पाकिस्तानला त्यांच्याच कर्माने कोसळू देणे किंवा त्यांना राजनैतिकदृष्ट्या पूर्णपणे एकाकी पाडणे, हाच आता खरा मार्ग आहे. ज्याप्रमाणे १९७१ मध्ये भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केले, तशीच काहीशी संधी आज पुन्हा चालून आली आहे, पण यावेळी युद्धभूमी आर्थिक आणि जागतिक राजकारणाची आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने 'झिरो टॉलरन्स'ची जी भूमिका घेतली, ती आता जगभरात मान्य केली जात आहे. २०२४-२५ या वर्षात भारताची संरक्षण निर्यात २४,००० कोटी रुपयांच्या पुढे जाणे, हे भारताच्या वाढत्या सामर्थ्याचे लक्षण आहे. आपण आता केवळ शस्त्रे खरेदी करणारे देश राहिलो नसून, शस्त्रे बनवणारे आणि शत्रूला धाक दाखवणारे राष्ट्र बनलो आहोत. चीनचा वरदहस्त असलेल्या पाकिस्तानला धडा शिकवताना भारताने अमेरिकेपासून रशियापर्यंत सर्वांना हे पटवून दिले आहे की, भारताची सुरक्षा ही तडजोडीची बाब नाही.

'ऑपरेशन सिंदूर'ने भारताला आत्मभान दिले आहे. मात्र, खरा विजय तेव्हाच होईल जेव्हा सीमेपलीकडून येणारा दहशतवादाचा प्रवाह कायमचा कोरडा पडेल. शत्रूची ताकद मोडणे सोपे असते, पण त्याची प्रवृत्ती नष्ट करणे हे कठीण काम आहे.

आता भारताला अशा धोरणाची गरज आहे, जे पाकिस्तानला दहशतवादाची किंमत इतकी महाग करून देईल की, त्यांना आपले अस्तित्व टिकवण्यासाठी शरणागती पत्करावी लागेल. "आम्ही चोख उत्तर देऊ" या भाषेवरून आता "आम्ही प्रश्नच उरणार नाही याची खात्री करू" या भूमिकेपर्यंत पोहोचणे, हेच भारताचे 'अंतिम ध्येय' असायला हवे.

# महापौर चषक कबड्डी स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

## राज्यभरातील ८१२ खेळाडूंचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** कबड्डी हा महाराष्ट्राच्या मातीतला आणि संस्कृतीशी घट्ट जोडलेला खेळ असून, ग्रामीण भागातील युवा खेळाडूंना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा महापौर चषक स्पर्धेच्या आयोजनामागील मुख्य उद्देश असल्याचे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी-चिंचवड शहर क्रीडा क्षेत्रातही अग्रस्थानी राहावे, यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने भोसरी येथील गावजत्रा मैदानात आयोजित करण्यात आलेल्या 'महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०२६' चे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, पीएमपीएल अध्यक्ष डॉ. महेश आव्हाड, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्य योगेश लांडगे, कुंदन गायकवाड, उपायुक्त पंकज पाटील, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपखजिनदार प्रकाश बालवडकर, सहसचिव राजाभाऊ ढमढेरे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते विराज लांडगे, राष्ट्रीय खेळाडू मच्छिंद्र लांडगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला अध्यक्षा कविता आल्हाट, माजी सचिव राजाभाऊ आंदेकर, सहसचिव संदीप पायगुडे, सामाजिक कार्यकर्ते राहूल लांडगे, स्वप्नील लांडगे, शिवराज काटे यांच्यासह मोठ्या संख्येने खेळाडू व नागरिक उपस्थित होते.

ही राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा १० मेपर्यंत चालणार असून, राज्यभरातील नामांकित संघांनी यात सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेत पुरुष गटातील ३६ आणि महिला गटातील २४ अशा एकूण ६० संघांचा समावेश असून, तब्बल ८१२ खेळाडू मैदानात उतरले आहेत. सामने शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पडावेत यासाठी ५५ सामनाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे यांनी स्पर्धेला राज्यभरातून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. आगामी काळात आणखी मोठ्या प्रमाणावर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून पिंपरी-चिंचवड शहराची क्रीडा ओळख अधिक मजबूत करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# रक्षक चौक उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात : अभिषेक बारणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपळे निलख येथील रक्षक चौकात सुरू असलेल्या उड्डाणपुलाचे काम आता अंतिम टप्प्यात आले असून, या पुलामुळे औंध ते सांगवी फाटा आणि रावेतमार्गे किवळेपर्यंतचा प्रवास लवकरच सिग्नलमुक्त आणि वाहतूककोंडीमुक्त होणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली. आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची पाहणी करून कामाचा आढावा घेण्यात आला.

या संदर्भात पिंपळे गुरव येथील जनसंपर्क कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची बैठकही आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये उड्डाणपुलाच्या कामाची सद्यस्थिती, वाहतूक व्यवस्थापन आणि पुढील नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. नगरसेविका आरती चोंधे, नगरसेविका स्नेहा कलाटे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सामाजिक कार्यकर्ते संकेत चोंधे, प्रसाद कस्पटे, सनी बारणे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

रक्षक चौक हा वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे आमदार शंकर जगताप यांच्या सूचनेनुसार पुलाचे काम पूर्ण करण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली.

# आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजनावर भर द्यावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील आपत्कालीन परिस्थितींना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी सर्व विभागांनी यंत्रणा सज्ज ठेवून आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजनावर भर द्यावा, असे निर्देश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले. शहरात पाणी साचणाऱ्या ठिकाणांची ओळख करून कायमस्वरूपी उपाययोजना करणे, नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करणे तसेच पूरप्रवण भागांतील नागरिकांच्या स्थलांतराचे पूर्वनियोजन करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.



पिंपरी येथील महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आयोजित मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, सहशहर अभियंते अजय सूर्यवंशी, सुनिल जावरानी, प्रेरणा सिनकर, अनिल भालसाखळे, मनोज सेठिया, माणिक चव्हाण, उपआयुक्त संदीप खोत, राजेश आगळे, अण्णा बोदडे, सिताराम बहुरे, डॉ. प्रदीप ठेंगल, व्यंकटेश दुर्वास, अतुल पाटील, चेतना केरूरे, ममता शिंदे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अजिंक्य येळे, अमित पंडित, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, पूजा दुधनाळे, अश्विनी गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, कार्यकारी अभियंते चंद्रकांत मुठाळ, शिवाजी चौरे, सुनिल शिंदे, हरविंदरसिंह बन्सल, दमयंती पवार, संतोष दुर्गे, महेश कावळे, समीर दळवी, जाहिरा मोमीन, राजेंद्र जावळे, गणेश राऊत, अभिमान भोसले, बी. पी. लांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी मान्सूनपूर्व तयारी आणि आपत्कालीन परिस्थितीत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची सविस्तर माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे मांडली.

# इंस्टाग्राम स्टोरीच्या वादातून कोयत्याने जीवघेणा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** पुण्यातील वाकड परिसरात इंस्टाग्राम स्टोरीवरून झालेल्या वादातून एका तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

या प्रकरणी वाकड पोलिसांनी चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. तसेच दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

ही घटना ५ मे रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास माऊली चौक, दत्त मंदिर रोड, वाकड येथे घडली. याप्रकरणी संगीता आकाश जाधव (वय ४९, रा. माऊली चौक, दत्त मंदिर रोड, वाकड) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा मुलगा उत्कर्ष आकाश जाधव याने आरोपी क्रमांक ३ याच्याबाबत इंस्टाग्राम अकाउंटवर स्टोरी पोस्ट केली होती. या स्टोरीवरून आरोपींनी उत्कर्षला जाब विचारत वाद घातला. त्यानंतर आरोपींनी संगनमत करून उत्कर्षवर कोयत्याने हल्ला केला.

या हल्ल्यात उत्कर्षच्या डोक्यावर आणि पायावर कोयत्याने वार करण्यात आले असून तो गंभीर जखमी झाला आहे. आरोपींनी परिसरात कोयते फिरवत दहशत निर्माण केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी दत्तात्रय उर्फ सोन्या रामेश्वर पांचाळ (वय १८), सूरज भुजबळ (वय २२) तसेच दोन अल्पवयीन मुलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०९, ३(५), क्रिमिनल लॉ ॲक्ट कलम ३ व ७, आर्म्स ॲक्ट कलम ४(२५) तसेच भारतीय दंड विधान कलम ३०७ आणि ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देशमुख करीत आहेत.

### पैशांच्या व्यवहारातून रॉडने हल्ला

**पुणे :** पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादातून एका तरुणाला बेदम मारहाण करून लोखंडी रॉडने गंभीर जखमी केल्याची घटना चिखली परिसरात घडली. याप्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना ५ मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास कुदळवाडी, चिखली येथील रविरंजन वजन काट्याच्या मागील दुकानाजवळ घडली. याप्रकरणी अफताब आलम अब्दुल मन्नान शेख (वय २८) यांनी फिर्याद दिली आहे. ते सध्या कुदळवाडी, चिखली येथे वास्तव्यास आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अफताब शेख हे त्यांच्या व्यवहारातील उर्वरित पैसे मागण्यासाठी आरोपी मुस्ताक चौधरी याच्याकडे गेले होते. त्यावेळी दोघांमध्ये वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपी मुस्ताक चौधरी याने फिर्यादीला हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली. यानंतर रशाद चौधरी, मुमताज चौधरी आणि फिरोज चौधरी हे देखील घटनास्थळी आले. चौघांनी मिळून फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. दरम्यान, आरोपी रशाद चौधरी याने लोखंडी रॉडने अफताब शेख यांच्या डोक्यावर आणि गळ्यावर वार करून त्यांना जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार घुमटकर करीत आहेत.

### सार्वजनिक ठिकाणी अनैतिक व्यवसाय

**आळंदी :** येथे इंद्रायणी नदीवरील नव्या पुलाजवळ सार्वजनिक ठिकाणी अनैतिक व्यवसायासाठी लोकांना इशारे करून अश्लील हावभाव केल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ मे रोजी दुपारी इंद्रायणी नदीवरील नव्या पुलाजवळ ही घटना घडली. संबंधित महिलेने अश्लील हावभाव व शब्दांचा वापर केला तसेच सार्वजनिक शिष्टाचार भंग होईल असे कृत्य केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# हिरा ग्रुपकडून २५ लाखांची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरीतील एका व्यावसायिक आणि त्यांच्या वडिलांची तब्बल २५ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सलीम लालमोहम्मद हन्नुरे (वय ५२, रा. मोरवाडी, पिंपरी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २०१७ साली त्यांनी आणि त्यांच्या वडिलांनी हिरा ग्रुपमध्ये गुंतवणूक केली होती. वार्षिक ३६ टक्के परताव्याचे आमिष दाखवत आरोपींनी त्यांच्याकडून अनुक्रमे २१ लाख रुपये आणि ४ लाख रुपये अशी एकूण २५ लाख रुपयांची गुंतवणूक करून घेतली.

सुरुवातीला आरोपींकडून ७९ हजार रुपयांचा परतावा देण्यात आला. त्यानंतर विविध कारणे सांगत उर्वरित रक्कम आणि परतावा देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी हिरा ग्रुपच्या हैदराबाद येथील मुख्य कार्यालयाशी संबंधित डॉ. नोहेरा शेख यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता अंतर्गत तसेच भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींविरोधात देशभरात अशाच प्रकारचे अनेक गुन्हे दाखल असून, त्यांना २०१८ मध्ये अटक करण्यात आली होती.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### हरवलेला चिमुकला पोलिसांमुळे सापडला

**आळेफाटा :** ओतूर बाजारपेठेतून सकाळपासून बेपत्ता झालेला साडेतीन वर्षांचा चिमुकला ओतूर पोलिसांच्या तत्पर शोधमोहिमेमुळे अवघ्या काही तासांत सुखरूप सापडला. आकाश प्रकाश केदार असे या मुलाचे नाव आहे. वाघदरा (ता.जुन्नर) येथील शेतमजूर प्रकाश किसन केदार (वय २५) यांनी शुक्रवारी सकाळी ओतूर पोलीस ठाण्यात धाव घेत आपल्या मुलाला बाजारपेठेतून एका महिलेने नेल्याची माहिती पोलिसांना दिली. तक्रार मिळताच पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तातडीने शोधमोहीम सुरू केली. बाजारपेठ, बसस्थानक, के.टी. बंधारा परिसर तसेच मार्केट यार्ड परिसरात स्वतंत्र तपास पथके रवाना करण्यात आली. दरम्यान, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता आकाश हा त्याच्या आजीसोबत जात असल्याचे निदर्शनास आले. मात्र आजीजवळ मोबाईल फोन नसल्याने तिच्याशी संपर्क होऊ शकत नव्हता. यानंतर पोलिसांनी शोधमोहीम अधिक वेगाने राबवत आकाशच्या आजीचा शोध घेतला आणि चिमुकल्याला सुखरूप ताब्यात घेत त्याच्या वडिलांकडे सुपूर्द केले. मुलगा सुरक्षित असल्याचे पाहून केदार कुटुंबीयांनी सुटकेचा निश्वास सोडला. या शोधमोहीमेत पोलीस हवालदार नरेंद्र गोराणे, दिनेश साबळे, देविदास खेडकर, मयुरी खोसे, विशाल गोडसे, योगेश उर्किडे आणि जोतिराम पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### जमिनीच्या वादातून तुंबळ हाणामारी

**उरुळी कांचन :** शिंदवणे ग्रामपंचायत हद्दीत जमिनीच्या किरकोळ वादातून दोन नातेवाईक गटांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याची घटना गुरुवारी (दि. ७) दुपारी दीडच्या सुमारास घडली. कटर, कोयता, लाथाबुक्क्या आणि चपलेने झालेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले असून उरुळी कांचन पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## नेरळ-शिरूर चौपदरी महामार्गास राज्य शासनाची मंजुरी

# पुणे-मुंबई वाहतुकीस नवा सक्षम पर्याय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** मुंबई-पुणे मार्गावरील वाढती वाहतूक कोंडी कमी करून मराठवाडा, अहमदनगर आणि पुणे जिल्ह्याला मुंबई आर्थिक केंद्राशी अधिक जलद जोडणी देण्यासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या नेरळ-शिरूर चौपदरी महामार्ग प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाने अधिकृत मंजुरी दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हा प्रकल्प खासगीकरण तत्त्वावर राबविण्यात येणार असून, यासंदर्भातील शासन निर्णय दि. ७ मे २०२६ रोजी जारी करण्यात आला आहे.

या महामार्गासाठी खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे यांनी सातत्याने विधानसभेत आवाज उठवत राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांनंतर शासनाने अखेर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास मंजुरी दिली असल्याची माहिती त्यांनी दिली. हा प्रस्तावित मार्ग उरण-कर्जत-नेरळ-वांद्रे-पाईट-शिरोली-पाबळ-मलठण ते शिरूर असा असणार आहे. विशेष म्हणजे, माळशेज घाट आणि बोरघाट यांच्यातील सुमारे ६० किलोमीटरच्या अंतरात हा नवा सक्षम पर्यायी मार्ग उभा राहणार आहे. या मार्गाची एकूण लांबी सुमारे २३३.७९५ किलोमीटर इतकी असणार आहे.

नेरळ-शिरूर या नवीन महामार्गामुळे पुणे-मुंबई प्रवासाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलणार असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकल्पाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सह्याद्रीच्या दुर्गम रांगांमधून विकसित करण्यात येणारा सुमारे २० किलोमीटर लांबीचा नवीन पर्यायी घाटमार्ग. या घाटमार्गासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाकडून तांत्रिक परवानगी मिळवण्याची प्रक्रिया सध्या युद्धपातळीवर सुरू आहे.

हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर तळेगाव, चाकण आणि शिक्रापूर यांसारख्या प्रमुख औद्योगिक पट्ट्यांतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच शिरूर, चाकण, तळेगाव आणि उरण परिसरातील औद्योगिक मालवाहतूक अधिक वेगवान आणि सुलभ होणार असल्याने उद्योग क्षेत्रालाही मोठा फायदा होणार आहे.

महामार्गामुळे औद्योगिक वाहतुकीसाठी सक्षम पर्यायी मार्ग उपलब्ध होईल. परिणामी वेळ, इंधन आणि वाहतूक खर्चात बचत होण्यास मदत होणार आहे. तसेच मराठवाडा आणि अहमदनगर भागातून मुंबईकडे जाणारी वाहतूक अधिक गतिमान होऊन व्यापारी आणि औद्योगिक संपर्काला चालना मिळणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

## रानमळा रस्त्यावर बिबट्याचे दर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील रानमळा परिसरात पुन्हा एकदा बिबट्याचे दर्शन झाल्याने ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाळूंजनगर-रानमळा रस्त्यावर गुरुवारी सायंकाळच्या सुमारास बिबट्या दिसून आल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवार (दि. ७ मे) रोजी सायंकाळी सहा ते सात वाजण्याच्या दरम्यान शेतकरी मारुती सिनलकर यांना वाळूंजनगर-रानमळा रस्त्यावर बिबट्या दिसला. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. रानमळा, वाळूंजनगर तसेच पैसा-गलठा परिसरात बिबट मादी आणि तिचे दोन बछडे फिरत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. अनेक नागरिकांना यापूर्वीही या बिबट्यांचे दर्शन झाल्याचा दावा स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

अवघ्या आठ दिवसांपूर्वी लोणी-रानमळा रस्त्यावर एका दुचाकीस्वारावर बिबट्याने हल्ला करून त्याला जखमी केले होते. त्या घटनेनंतरही वन विभागाने ठोस उपाययोजना केल्या नसल्याची नाराजी ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

परिसरातील उसाचे क्षेत्र कमी झाल्यामुळे बिबट्यांना लपण्यासाठी सुरक्षित जागा उरलेली नाही. त्यामुळे अन्न आणि पाण्याच्या शोधात बिबट्यासह इतर जंगली प्राणी मानवी वस्तीकडे वळत आहेत. परिणामी शेतकरी, नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब वाळूंज, रानमळ्याचे सरपंच राजेंद्र भगवान सिनलकर, वाळूंजनगरचे सरपंच महेंद्र वाळूंज तसेच ग्रामस्थांनी वन विभागाकडे तातडीने पिंजरा लावण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात वन विभागाचे वनपाल चव्हाण यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले. "या परिसरात फिरताना नागरिकांनी काळजी घ्यावी. लहान मुलांना एकटे सोडू नये आणि रात्रीच्या वेळी अनावश्यक बाहेर पडणे टाळावे," असे त्यांनी सांगितले.

## डॉ. आंबेडकर स्मारक पूर्णत्वास नेणार



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** येथे सिद्धार्थ सेवा संघाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, माता रमाई आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. यानिमित्त महापुरुषांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक काढण्यात आली असून त्यानंतर सामुदायिक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी आंबेगाव तालुक्यात उभारण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यांनी सांगितले की, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून राज्य शासनाकडे स्मारकासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून लवकरच या प्रयत्नांना यश मिळेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्या श्वेता ढोबळे, सरपंच नितीन ढोबळे, भीमाशंकर कारखान्याचे संचालक माऊली अस्वारे, शरद बँक संचालक दौलतभाई लोखंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष गौतम खरात, मुंबई प्रदेश आरपीआयचे उपाध्यक्ष रतन अस्वारे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते प्रा. अक्षय साळवे यांचे प्रेरणादायी आणि सुश्राव्य व्याख्यान झाले. यावेळी गौतम खरात, दौलत लोखंडे आणि रतन अस्वारे यांनीही समाजप्रबोधनपर विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र अस्वारे यांनी केले, तर आयोजक सिद्धार्थ सेवा संघाचे अध्यक्ष सचिन अस्वारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## लेकीचा खून करणाऱ्या बापाला १२ तासांत अटक

### आळेफाटा पोलिसांची कामगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** स्वतःच्या अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकल्या मुलीचा गळा दाबून खून करणाऱ्या नराधम बापाला आळेफाटा पोलिसांनी अवघ्या १२ तासांच्या आत अटक केली. सागर सदाशिव शिंदे (वय २९, रा. गायकवाड वस्ती, मोशी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या घटनेमुळे जुन्नर तालुक्यात खळबळ उडाली असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ मे २०२६ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास पुणे-नाशिक महामार्गालगत सतबावडी (ता. जुन्नर) परिसरातील जंगलातून एक पाच वर्षांचा मुलगा रडत बाहेर येताना काही नागरिकांना दिसला. नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी मुलाची विचारपूस केली असता त्याने आपले नाव आर्यन सागर शिंदे असल्याचे सांगितले. तसेच "माझे बाबा मला आणि माझ्या बहिणीला फिरायला घेऊन आले होते. रात्री जंगलात सोडून गेले. माझी बहीण हर्षदा कुठे आहे माहिती नाही," असे सांगितले.

या माहितीने पोलिसांना संशय आल्याने त्यांनी तत्काळ मुलाचे आजोबा सदाशिव शिंदे यांना संपर्क केला. त्यांनी पोलिसांना सांगितले की, सागर शिंदे हा ४ मे रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास मुलगा आर्यन आणि मुलगी हर्षदा यांना फिरायला घेऊन जात असल्याचे सांगून घराबाहेर पडला होता. त्यानंतर तो ६ मे रोजी सकाळी एकटाच घरी परतला. मुलांबाबत विचारणा केली असता, "मुले मामाच्या घरी ठेवली आहेत," असे खोटे उत्तर त्याने दिले होते.

या संशयावरून पोलिसांनी सागर शिंदे याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली. चौकशीदरम्यान त्याने आपल्या मुलगी हर्षदाचा गळा दाबून खून केल्याची कबुली दिली. तसेच मृतदेह फॉरेस्ट हॉटेलसमोरील जंगल परिसरात फेकून दिल्याचेही सांगितले.

पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तत्काळ शोधमोहीम राबवली. अखेर ७ मे २०२६ रोजी जंगल परिसरातून हर्षदा (वय ३.५ वर्षे) हिचा मृतदेह आढळून आला. मृतदेह शवविच्छेदनासाठी आळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपी सागर शिंदे याच्याविरुद्ध आळेफाटा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १३३/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १०३(१), १०९, ९३ आणि २३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात पोलीस निरीक्षक विश्वास जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर, पोलीस हवालदार विनोद गायकवाड, पंकज पारखे, अमित माळुंजे, पोपट कोकाटे, विकास गोसावी, नवीन अरगडे, ओंकार खुणे, गणेश जगताप, प्रशांत तांगडकर आणि कांचन रानडे यांनी सहभाग घेतला.

## सराईत गुन्हेगाराला ओतूर पोलिसांकडून अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** दत्तवाडी-डिंगोरे परिसरात घरात घुसून मारहाण करत रोख रक्कम आणि मोबाईलची जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला ओतूर पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ मार्च २०२६ रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास मौजे दत्तवाडी, डिंगोरे (ता. जुन्नर) येथील सहादु सावळेराम उकिर्डे हे आपल्या घरात झोपलेले असताना तीन अज्ञात इसमांनी घराचा कडी-कोयंडा उचकटून आत प्रवेश केला. आरोपींनी उकिर्डे यांच्यावर हल्ला करत त्यांच्या उजव्या कानावर मारहाण केली आणि घरातील १५ हजार रुपयांची रोकड तसेच पाच हजार रुपये किमतीचा मोटोरोलाचा मोबाईल जबरदस्तीने चोरी करून नेला.

या प्रकरणी सहादु उकिर्डे यांचे नातू अक्षय शिवाजी उकिर्डे यांनी ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३०९(६), ३३३, ११८(१), ३०५ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप आमणे यांच्याकडे सोपविण्यात आला होता.

ओतूर पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, पुणे ग्रामीण यांच्या संयुक्त तपासातून हा गुन्हा कबीर उंबऱ्या काळे (वय २४), बाबुशा पिंग्या उर्फ चिंगळया काळे (वय २२), शुभम पिंग्या काळे (वय २०) आणि रवी लाला भोसले (वय ५०, सर्व रा. सुरेगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) यांनी केल्याचे निष्पन्न झाले. यातील कबीर उंबऱ्या काळे याला ५ मे रोजी अटक करण्यात आली. पोलिस कोठडीत सखोल चौकशीदरम्यान त्याच्याकडून चोरी गेलेली १५ हजार रुपयांची रोकड तसेच गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले. त्यानंतर ६ मे रोजी त्याची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी दिली.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, बारामती विभागाचे अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, पोलीस उपनिरीक्षक संदीप आमणे, पोलीस हवालदार नरेंद्र गोराणे, दिनेश साबळे, पोलीस कॉन्स्टेबल सुभाष केदारी तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, पोलीस हवालदार दीपक साबळे आणि संदीप वारे यांनी सहभाग घेतला.

## 'ड्रग्जमुक्त गाव' मोहिमेला रांजणगावात वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती :** रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाणे हद्दीत वाढत्या ड्रग्ज विक्री तसेच डॉक्टरांच्या वैध चिठ्ठीशिवाय औषध विक्रीच्या प्रकारांच्या पार्श्वभूमीवर 'ड्रग्जमुक्त गाव' मोहिमेला वेग देण्यात आला आहे. कारेगाव येथील कारेश्वर मंदिर सभागृहात आयोजित बैठकीत पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी ग्रामस्थ आणि युवकांना अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी ड्रग्ज विक्री, सेवन आणि वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला. अंमली पदार्थांच्या व्यवहारात सहभागी असणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच डॉक्टरांच्या वैध प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री करणाऱ्या मेडिकल दुकानदारांवर औषध व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी समाजाने एकत्र येणे आवश्यक असल्याचे सांगत नागरिकांनी ड्रग्जसंदर्भातील कोणतीही माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. या बैठकीला पंचायत समितीचे माजी सभापती विश्वास कोहकडे, सुनील ओस्तवाल, पृथ्वीराज नवले, डॉ. हिरामण गावडे, डॉ. अशोक साबळे, हनुमंत शेवाळे, डॉ. संदीप बच्छाव, ग्रामपंचायत अधिकारी किसन बिबे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी 'ड्रग्जमुक्त गाव' घडविण्याची शपथ घेतली.

## मांदळेवाडीत दोन दिवस वीजपुरवठा खंडित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील मांदळेवाडी येथे सलग दोन दिवस वीजपुरवठा खंडित राहिल्याने ग्रामस्थांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. विशेषतः पिण्याच्या पाण्याच्या समस्येमुळे नागरिक आणि पशुपालकांचे हाल झाले. याप्रकरणी महावितरणच्या कारभाराविरोधात ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मांदळेवाडी गावाला शिरूर तालुक्यातील रांजणगाव येथून वीजपुरवठा केला जातो. हा पुरवठा कान्हूर मेसाई येथील उपकेंद्रात येऊन पुढे ढगेवाडीमार्गे मांदळेवाडीपर्यंत पोहोचतो. त्यामुळे वीजपुरवठ्याची जबाबदारी शिरूर तालुक्यातील यंत्रणेकडे असल्याने संबंधित कर्मचारी मनमानी पद्धतीने काम करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

बुधवारी (दि. ६) सकाळी आठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास एका अज्ञात वाहनाने सिमेंटच्या विद्युत खांबाला धडक दिली. या धडकेत खांब जमिनीवर कोसळला आणि गावाचा वीजपुरवठा खंडित झाला. त्यानंतर तब्बल दोन दिवस गाव अंधारात होते.

वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेत अथक प्रयत्नांनी पडलेला विद्युत खांब उभा केला. त्यानंतर गुरुवारी (दि. ७) दुपारी सुमारे तीन वाजता वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. मात्र या संपूर्ण काळात कोणत्याही लोकप्रतिनिधींनी किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी मदतीसाठी पुढाकार घेतला नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ढगेवाडी आणि कान्हूर मेसाई येथे वीजपुरवठा सुरळीत असताना केवळ मांदळेवाडीतच वारंवार वीज खंडित होते. तसेच गावात दररोज सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत भारनियमन करण्यात येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

अज्ञात वाहनाने विद्युत खांबाला धडक दिल्यानंतर महावितरण कंपनीने संबंधित वाहनचालकाविरोधात कोणती कारवाई केली नाही, हा देखील परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे. या प्रकाराला जबाबदार कोण, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. यापुढे मांदळेवाडीकरांना वीजपुरवठ्याचा असा त्रास सहन करावा लागल्यास पाबळ उपवीज केंद्रावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सरपंच उज्वला आदक, उपसरपंच रवि ढगे पाटील, तंटामुक्ति समिती अध्यक्ष सुनिल आदक आणि ग्रामस्थांनी दिला आहे.

## पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन मोबदला वितरणाला सुरुवात

# पहिला धनादेश उदाचीवाडीतील शेतकऱ्याला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुरंदर तालुक्यात प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला आता प्रत्यक्ष गती मिळाली असून, गुरुवार (दि. ७ मे) पासून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोबदल्याचे धनादेश वितरित करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या प्रक्रियेतील पहिला धनादेश उदाचीवाडी येथील शेतकरी विलास कुंभारकर यांना प्रदान करण्यात आला.

पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प हा पुणे जिल्ह्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील औद्योगिक, व्यावसायिक आणि रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या काही महिन्यांपासून विमानतळासाठी आवश्यक जमिनींच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होती. आता मोबदला वाटपाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने प्रकल्पाच्या कामकाजाला आणखी वेग येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

उदाचीवाडी येथे आयोजित कार्यक्रमात शेतकरी विलास कुंभारकर यांना पहिला धनादेश सुपूर्त करण्यात आला. यावेळी भूसंपादन अधिकारी कल्याण पांढरे, प्रांताधिकारी वर्षा लांडगे यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी, ग्रामस्थ आणि प्रकल्पग्रस्त शेतकरी उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असल्याची ग्वाही यावेळी दिली.

प्रशासनाकडून संबंधित शेतकऱ्यांची कागदपत्रे, सातबारा उतारे तसेच मालकी हक्कांची पडताळणी पूर्ण करण्यात येत असून, टप्प्याटप्प्याने इतर शेतकऱ्यांनाही मोबदल्याचे धनादेश वितरित केले जाणार आहेत. अनेक शेतकऱ्यांनी यापूर्वीच भूसंपादन प्रक्रियेस संमती दर्शविली असून, मोबदल्यासोबत विकसित भूखंड देण्याच्या निर्णयामुळे सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, या विमानतळ प्रकल्पामुळे पुरंदर तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. विमानतळामुळे परिसरात रस्ते, पाणी, वीज यांसारख्या पायाभूत सुविधांचा विकास होणार असून, स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## न्यू इंग्लिश स्कूलचे घवघवीत यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** इंदापूर तालुक्यातील लाकडी येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

या परीक्षेत गौरी संजय वनवे हिने एनटीडी प्रवर्गात द्वितीय क्रमांक मिळवला. अंकिता बापूराव वनवे हिने एनटीडी प्रवर्गात सातवा क्रमांक, तर मयुरी सचिन वनवे हिने आठवा क्रमांक मिळवला. तसेच प्रणव संतोष मोरे याने ओबीसी प्रवर्गातून ४८ वा क्रमांक आणि अभिषेक भागवत कुंभार याने ओबीसी प्रवर्गातून ७७ वा क्रमांक मिळवला. शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या या पाच विद्यार्थ्यांना दरवर्षी १२ हजार रुपये याप्रमाणे चार वर्षांसाठी एकूण ४८ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.

विद्यालयातून एकूण ३० विद्यार्थी या परीक्षेस बसले होते. त्यापैकी २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यातून पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. मुख्याध्यापक बापूराव ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक संजय रोडे, उत्तम वायाळ, किशोर टकले तसेच बालाजी हजारे यांनी मार्गदर्शन केले. ग्राम विद्या विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष आप्पासाहेब ढोले, उपाध्यक्ष सदाशिव ढोले, सचिव नानासाहेब वनवे, संचालक मनोहर सांगळे, आबासाहेब ढोले, संजय ढोले यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## सारांश वृत्त

### शिमला येथे पेन्शन घोटाळा उघड

**शिमला:** वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळावे यासाठी, शिमला येथील ४४ ते ५४ वयोगटातील ४० हून अधिक लोकांना अधिकृत पंचायत नोंदींमध्ये खोट्या पद्धतीने 'वृद्ध' दाखवण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी दिली. हिमाचल प्रदेशातील ३,७५४ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच ही बातमी समोर आली आहे.

### स्वच्छ राजकारणाचा आपचा दावा उघड

**नवी दिल्ली** : अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) अलीकडील छाप्यांवरून भाजपने शुक्रवारी 'आप'च्या नेतृत्वाखालील पंजाब सरकारवर जोरदार हल्ला चढवला. एकेकाळी "प्रामाणिकपणाची प्रमाणपत्रे वाटणाऱ्या" लोकांच्याच जवळच्या सहकाऱ्यांच्या ठिकाणी आता छापे टाकले जात असल्याचा आरोप भाजपने केला आहे. गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली दोन रिअल्टी ग्रुप्सविरुद्ध सुरू असलेल्या मनी लाँडरिंग चौकशीचा भाग म्हणून, ईडीने पंजाब आणि चंदीगडमधील अनेक ठिकाणी, राज्यातील आम आदमी पार्टीच्या एका पदाधिकाऱ्याच्या कथित सहकाऱ्याच्या परिसरासह, शोधमोहीम राबवली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### सायबर फसवणूक रॅकेटचा पर्दाफाश

**नवी दिल्ली** : भारतीय हवाई दलाचे अधिकारी असल्याचे भासवून बनावट कागदपत्रांच्या आधारे व्यापाऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सायबर फसवणूक रॅकेटचा दिल्ली पोलिसांनी पर्दाफाश केला आहे, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. सिम कार्ड ग्राहक आणि मध्यस्थांसह चार आरोपींना अटक करण्यात आली आहे, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनानुसार, एका तक्रारदाराने गुन्हे शाखेकडे तक्रार केली की, औद्योगिक दर्जाचा माल असलेल्या ॲल्युमिनिस लॅटेराइटचा पुरवठा करण्याच्या बहाण्याने त्याची ५ लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक झाली.

## प्रवाशांच्या खिशाला मोठी कात्री

# विमानभाड्यात 30 टक्क्यांपर्यंत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** उन्हाळी सुट्टी सुरू होताच देशभरातील प्रमुख पर्यटनस्थळांकडे पर्यटकांचा ओघ वाढला असून त्याचा थेट परिणाम विमान प्रवासाच्या तिकीट दरांवर झाला आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानभाड्यात तब्बल २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली असून प्रवाशांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे.



वाढती प्रवासी मागणी, एव्हिएशन टर्बाइन फ्युएल दरवाढ आणि पर्यटन हंगामामुळे विमान कंपन्यांनी तिकीटदर वाढवले आहेत. विशेषतः गोवा, हिमाचल प्रदेश, काश्मीर, लेह-लडाख, उत्तराखंड तसेच दक्षिण भारतातील पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या मार्गांवर दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. महाराष्ट्रातील अनेक पर्यटक उकाड्यापासून दिलासा मिळवण्यासाठी थंड हवेच्या ठिकाणी प्रवास करत असल्याने विमानप्रवासाची मागणी प्रचंड वाढली आहे.

मे महिना हा हवाई प्रवासासाठी वर्षातील सर्वाधिक गर्दीचा काळ मानला जातो. जूनच्या मध्यापर्यंत पर्यटन हंगाम सुरू राहणार असल्याने विमान कंपन्यांवर अतिरिक्त ताण वाढला आहे. रेल्वे किंवा रस्तेमार्गे हिमाचल, काश्मीर किंवा लेह-लडाख येथे पोहोचण्यासाठी ३० तासांहून अधिक वेळ लागत असल्याने अनेक पर्यटक विमानप्रवासालाच प्राधान्य देत आहेत. परिणामी तिकिटांचे दर झपाट्याने वाढत आहेत. मुंबईहून लेह-लडाखला जाणाऱ्या प्रवाशांना आता एका तिकिटासाठी तब्बल २४ ते २५ हजार रुपये मोजावे लागत आहेत. काही महिन्यांपूर्वी हेच तिकीट तुलनेने कमी दरात उपलब्ध होते.

उत्तराखंडमधील पर्यटनासाठी देहराडून हे प्रमुख विमानतळ मानले जाते. मुंबई-देहराडून मार्गावरील तिकीट दर पूर्वी ६ ते ७ हजार रुपयांच्या दरम्यान होते. मात्र सध्या हेच तिकीट २१ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

दार्जिलिंगला जाणाऱ्या पर्यटकांनाही वाढीव दरांचा फटका बसत आहे. दार्जिलिंगसाठी बागडोगरा विमानतळावर उतरावे लागते. मुंबई-बागडोगरा विमानप्रवासासाठी पूर्वी साधारण ५ हजार रुपये खर्च येत होता, तर आता हेच तिकीट १८ हजार रुपयांपर्यंत गेले आहे.

हिमाचल प्रदेशातील शिमला, मनाली, कुलू आणि डलहौसी या लोकप्रिय पर्यटनस्थळांसाठी धर्मशाळा हे महत्त्वाचे विमानतळ मानले जाते. सध्या मुंबई-धर्मशाळा विमानप्रवासासाठी प्रवाशांना तब्बल ३० ते ३१ हजार रुपये मोजावे लागत आहेत. त्यामुळे कुटुंबासह पर्यटनाचा बेत आखणाऱ्यांच्या बजेटवर मोठा परिणाम होत आहे. विमान कंपन्यांच्या मते, वाढती प्रवासी संख्या, इंधन दरवाढ आणि पर्यटन हंगामामुळे तिकिटांचे दर वाढले आहेत. आगामी काही आठवडे ही परिस्थिती कायम राहण्याची शक्यता असून अनेक प्रवासी आता आगाऊ बुकिंग किंवा पर्यायी पर्यटनस्थळांचा विचार करत आहेत.

## डाव्यांचा विजयला पाठिंबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** दक्षिण भारतातील तामिळनाडू राज्यात नवीन सरकार स्थापन होण्याबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. दोन दिवसांच्या राजकीय रस्सीखेचीनंतर, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीपीएम, सीपीआय आणि व्हीसीके यांनी थलपथी विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

या तीन पक्षांच्या पाठिंब्याने राज्यात नवीन सरकार स्थापन करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, विजय आज या संदर्भात राज्यपालांची तिसऱ्यांदा भेट घेणार आहेत. ही भेट सायंकाळी होणार आहे.

या तीन पक्षांच्या पाठिंब्याने, विजय यांना आता २३४-सदस्यीय विधानसभेत बहुमत म्हणजेच ११८ आमदारांचा पाठिंबा मिळाला आहे. टीव्हीकेकडे १०७ आमदार आहेत. विजय यांनी दोन जागा जिंकल्यामुळे एक जागा रिक्त करावी लागेल. याशिवाय, काँग्रेसचे पाच आमदार आहेत, ज्यांनी आधीच पाठिंबा जाहीर केला आहे. ज्या तीन पक्षांनी आज पाठिंबा जाहीर केला आहे, त्या प्रत्येकाकडे दोन आमदार आहेत. अशाप्रकारे, विजय यांना आता बहुमत म्हणजेच ११८ आमदारांचा पाठिंबा मिळाला आहे.

ताज्या घडामोडींमुळे दोन दिवसांची राजकीय अनिश्चितता आणि राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांच्यासोबतचा टीव्हीकेचा सुरू असलेला संघर्ष संपुष्टात येण्याची शक्यता असून, यामुळे पुढील सरकार स्थापन करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना आणखी बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

टीव्हीकेच्या सूत्रांनी सांगितले की, विजय यांनी आज दुपारी ४:३० वाजता राज्यपालांची भेट मागितली असून, प्रमुख विरोधी पक्षांचा पाठिंबा मिळवून सरकार स्थापन करण्याचा आपला दावा ते पुन्हा एकदा मांडण्याची शक्यता आहे.

माध्यमांच्या वृत्तानुसार, साधारण त्याच वेळी सर्व समर्थक पक्ष एक संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आपला निर्णय औपचारिकपणे जाहीर करतील, असे वृत्तात म्हटले आहे.

## टीव्हीकेला काँग्रेसचा पाठिंबा पुरेसा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** टीव्हीके अध्यक्ष सी. जोसेफ विजय यांना सरकार स्थापनेसाठी आवश्यक ११८ आमदारांचा पाठिंबा सिद्ध करता न आल्याने तामिळनाडूच्या राजकारणात मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर एडप्पाडी के. पलानीस्वामी हे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांची भेट घेऊ शकतात, अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. मात्र, एआयएडीएमके कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सीपीआय, सीपीएम आणि व्हीसीके यांच्या भूमिकेची प्रतीक्षा करत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

चेन्नई येथे पत्रकारांशी बोलताना एआयएडीएमकेचे ज्येष्ठ नेते एम. थंबीदुराई म्हणाले, "सध्या विविध स्तरांवर चर्चा सुरू आहेत. योग्य वेळी चांगल्या घडामोडी घडतील, अशी आम्हाला अपेक्षा आहे." त्यांनी सांगितले की, "एआयएडीएमके पुन्हा सत्तेत यावी, अशी जनतेची भावना आहे. आमचे नेते एडप्पाडी के. पलानीस्वामी पुन्हा सत्तेत येऊन सुशासन देतील, असा विश्वास कार्यकर्त्यांना आहे." टीव्हीकेला पाठिंबा द्यायचा की नाही यावर डीएमकेचा मित्रपक्ष असलेल्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) अर्थात सीपीआय (एम) पक्षामध्ये चर्चा सुरू आहे. कार्यकारिणीतील सदस्यांची मते जाणून घेतली जात असून त्यानंतर अंतिम निर्णय जाहीर केला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

टीव्हीकेने काँग्रेससोबत निवडणुकीनंतरचा करार निश्चित करत सत्तेत भागीदारीचे आश्वासन दिले आहे. निवडणुकीत १०८ जागा जिंकून टीव्हीके हा सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला असला तरी बहुमतासाठी अजून १० आमदारांची गरज आहे. सीपीआय (एम) तामिळनाडूचे राज्य सचिव पी. षण्मुगम यांनी विजय यांना तातडीने सरकार स्थापनेसाठी निमंत्रण द्यावे, अशी मागणी केली आहे.

## बंगालमध्ये सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** अमित शाह यांच्या पश्चिम बंगाल दौऱ्यामुळे राज्यातील सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून ते कोलकाता येथे दाखल झाले असून, पक्षाच्या सर्व २०६ आमदारांना ते संबोधित करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

दरम्यान, सुवेंदू अधिकारी यांचे नाव मुख्यमंत्रीपदासाठी जवळपास निश्चित मानले जात आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, दोन उपमुख्यमंत्र्यांचाही शपथविधी होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. याबाबतची अधिकृत घोषणा आज संध्याकाळपर्यंत होण्याची शक्यता आहे. भाजपने अद्याप मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराची अधिकृत घोषणा केलेली नसली तरी, दोन महत्त्वपूर्ण विजयांमुळे सुवेंदू अधिकारी आघाडीवर असल्याचे मानले जात आहे. त्यांनी नंदीग्राम मतदारसंघ राखण्यात यश मिळवले असून, २०२१ मध्ये त्यांनी ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता. यावेळी त्यांनी भवानीपूर मतदारसंघातही विजय मिळवत तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे.

एकेकाळी ममता बॅनर्जी यांच्या निकटवर्तीयांपैकी असलेले सुवेंदू अधिकारी डिसेंबर २०२० मध्ये भाजपमध्ये दाखल झाले होते. त्यानंतर ते राज्यातील भाजपच्या आक्रमक प्रचार मोहिमेचे प्रमुख चेहरे बनले. राज्य मंत्रिमंडळात दिलीप घोष, अग्निमित्रा पॉल, निशीथ प्रामाणिक, रूपा गांगुली, स्वपन दासगुप्ता, शंकर घोष, तपस रॉय, अशोक डिंडा आणि डॉ. राजेश कुमार यांनाही संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आज सकाळी नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुवेंदू अधिकारी आणि अन्य भाजप नेत्यांनी अमित शाह यांचे स्वागत केले. त्यानंतर शाह न्यू टाऊनमधील हॉटेलमध्ये रवाना झाले. दुपारी ते विश्व बांगला कन्व्हेन्शन सेंटर येथे होणाऱ्या भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. शनिवारी ब्रिगेड परेड ग्राऊंडवर नव्या सरकारचा शपथविधी सोहळा पार पडणार असून, त्यासाठी नरेंद्र मोदी, भाजप अध्यक्ष नितीन नवीन तसेच एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक विजय मिळवत तृणमूल काँग्रेसच्या सत्तेला पूर्णविराम दिला.

## मुख्यमंत्रीपदासाठी के. सी. वेणुगोपाल यांचे पारडे जड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुवनंतपुरम :** केरळच्या पुढील मुख्यमंत्रीपदासाठी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या हालचालींना आता वेग आला असून एआयसीसीचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांचे पारडे सध्या सर्वाधिक जड असल्याचे स्पष्ट झाले आहे. पक्षातील सूत्रांच्या माहितीनुसार, एआयसीसीच्या केंद्रीय निरीक्षकांसोबत झालेल्या चर्चेदरम्यान काँग्रेसच्या ६३ पैकी तब्बल ४७ नव-निर्वाचित आमदारांनी वेणुगोपाल यांच्या नावाला पाठिंबा दर्शविला आहे.

केपीसीसी अध्यक्ष सनी जोसेफ यांच्यासह संदीप जी. वेरियर, सजीव जोसेफ, टी. ओ. मोहन आणि उषा विजयन या आमदारांनीही वेणुगोपाल यांच्या नावाचा प्रस्ताव मांडल्याचे सांगितले जात आहे. मुख्यमंत्रीपदाचे दुसरे प्रमुख दावेदार रमेश चेन्नीथला यांना केवळ आठ आमदारांचा पाठिंबा मिळाल्याची माहिती सूत्रांनी दिली. तर विद्यमान विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीशन यांना सहा आमदारांनी समर्थन दिले आहे. विशेष म्हणजे, वेणुगोपाल स्वतः निरीक्षकांच्या बैठकीला उपस्थित नव्हते. तरीही त्यांच्या नावाला मिळालेल्या मोठ्या पाठिंब्यामुळे काँग्रेस हायकमांडसमोर त्यांची मजबूत दावेदारी निर्माण झाली आहे. एआयसीसी निरीक्षक अजय माकन आणि मुकुल वासनिक यांनी आमदार, खासदार आणि वरिष्ठ नेत्यांशी स्वतंत्र चर्चा करून त्यांची मते जाणून घेतली आहेत. त्यांचा सविस्तर अहवाल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे सादर केला जाणार आहे.

दरम्यान, काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत पुढील मुख्यमंत्री निवडण्याचा अधिकार खर्गे यांना एकमताने देण्यात आला. पक्ष हायकमांड येत्या शनिवार किंवा रविवारपर्यंत मुख्यमंत्रीपदाचा अंतिम निर्णय जाहीर करण्याची शक्यता आहे.

## मणिशंकर अय्यरांचा राजकीय संधीसाधूपणाचा आरोप

# टीव्हीके युतीवर काँग्रेसमध्येच नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** तामिळनाडूमध्ये अभिनेते-राजकारणी विजय यांच्या टीव्हीके पक्षासोबत काँग्रेसने केलेल्या युतीवर आता पक्षांतर्गत नाराजी उघडपणे समोर येऊ लागली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री मणिशंकर अय्यर यांनी या निर्णयावर तीव्र टीका करत, हा निर्णय "भयंकर" असून त्यामध्ये "नीच राजकीय संधीसाधूपणाचा वास" येत असल्याचे म्हटले आहे.

अय्यर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, डीएमकेसोबत निवडणूक लढवल्यानंतर लगेचच काँग्रेसने पक्ष सोडून त्याच टीव्हीकेसोबत हातमिळवणी करणे, ज्याने काँग्रेसला अनेक मतदारसंघांत थेट आव्हान दिले होते, हे राजकीय आणि नैतिकदृष्ट्या चुकीचे आहे.

अय्यर म्हणाले, "महात्मा गांधी यांनी १९२५ मध्ये मांडलेल्या 'स्वराज्य हे नैतिकतेवर आधारित सरकार असले पाहिजे' या विचारांचे हे अक्षम्य उल्लंघन आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक अशा सोयीस्कर राजकारणाला कधीच मान्यता दिली नसती."

अय्यर यांनी काँग्रेसच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी नमूद केले की, काँग्रेसने जिंकलेल्या पाच जागा या स्वतःच्या बळावर नव्हत्या, तर डीएमकेसोबतच्या दीर्घकालीन आघाडीमुळे मिळालेल्या होत्या. त्यांनी आपल्या मयिलादुथुराई मतदारसंघाचे उदाहरण देत सांगितले की, तेथील बहुतांश विधानसभा मतदारसंघांनी टीव्हीकेला नाकारून डीएमके आघाडीच्या उमेदवारांना पाठिंबा दिला होता. "जनादेश स्पष्टपणे डीएमकेच्या नेतृत्वाखालील आघाडीच्या बाजूने होता आणि नव्या पक्षाच्या विरोधात होता," असे अय्यर यांनी ठामपणे सांगितले. टीव्हीकेचे नेते विजय धर्मनिरपेक्ष आणि द्रविड विचारधारेचे असल्याचे मान्य करतानाही अय्यर यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. "अनेक दशकांपासून कठीण काळात साथ देणाऱ्या मित्रपक्षाला अचानक सोडणे हे केवळ राजकीय संधीसाधूपणाचे उदाहरण आहे. हे चाणक्याचे राजकारण असू शकते; पण गांधीजींच्या काँग्रेसचे नाही," असे ते म्हणाले.

काँग्रेसने 'इंडिया' आघाडीत राहुल गांधी यांना पंतप्रधानपदासाठी सर्वप्रथम पाठिंबा देणाऱ्या डीएमकेला दूर करणे योग्य आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. "बुडणाऱ्या जोडीदाराला सोडून त्याला बुडवणाऱ्यांसोबत किनाऱ्यावर जाणे योग्य आहे का?" असा उपरोधिक प्रश्न त्यांनी विचारला. राजकीयदृष्ट्याही हा निर्णय धोकादायक ठरू शकतो, असा इशाराही अय्यर यांनी दिला.

## नोएडा हिंसाचार प्रकरणी जामीन नाकारला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी नोएडा येथील औद्योगिक कामगारांच्या आंदोलनादरम्यान हिंसाचार भडकवल्याचा आरोप असलेल्या विद्यार्थिनी आकृती चौधरी हिला जामीन देण्यास नकार दिला. तसेच, याप्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयात दाद मागण्याचे निर्देश दिले.



न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि उज्जल भुयान यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. आरोपी असलेली दिल्ली विद्यापीठाची विद्यार्थिनी आकृती चौधरी हिने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने, "प्रत्येकजण थेट संविधानाच्या कलम ३२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात येतो. येथे आधीच ९३ हजारांहून अधिक खटले प्रलंबित आहेत," असे निरीक्षण नोंदवले.

चौधरी यांच्या वकिलांनी पोलिसांनी अटकेची कारणे स्पष्ट केली नसल्याचा दावा करत, त्या दिल्लीतील दौलत राम कॉलेज मधील पदव्युत्तर विद्यार्थिनी असल्याचे सांगून जामिनाची मागणी केली होती.

दरम्यान, कोठडीत छळ झाल्याचा आरोप करणाऱ्या केशव आनंद यांनी दाखल केलेल्या स्वतंत्र याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश पोलिसांना नोटीस बजावली आहे. यापूर्वी नोएडा न्यायालयाने आकृती चौधरी, मनीषा चौहान आणि सृष्टी गुप्ता या तिघींना सशर्त पोलीस कोठडी सुनावली होती. या तिघींवर १३ एप्रिल रोजी औद्योगिक कामगारांच्या आंदोलनादरम्यान हिंसाचार भडकवल्याचा आरोप आहे. पोलिसांच्या मते, आरोपींच्या निवासस्थानावरून महत्त्वाचे पुरावे मिळण्याची शक्यता असल्याने कोठडी आवश्यक होती. गेल्या महिन्यात नोएडामध्ये वेतनवाढीच्या मागणीसाठी विविध औद्योगिक युनिटमधील कामगारांनी आंदोलन केले होते. आंदोलनादरम्यान घोषणाबाजी, दगडफेक, मालमत्तेची तोडफोड तसेच वाहन जाळण्याचे प्रकार घडल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

## कोलकाता येथे भाजप विधिमंडळाची बैठक

**कोलकाता :** पश्चिम बंगालचा नेता आणि मुख्यमंत्री निवडण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत शुक्रवारी येथे भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक सुरू झाली. शहरातील एका हॉटेलमध्ये आयोजित बैठकीला भाजपचे नवनिर्वाचित आमदार, केंद्रीय निरीक्षक आणि राज्यातील वरिष्ठ नेते उपस्थित होते. अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांचा बालेकिल्ला असलेल्या भवानीपूर येथे विजय मिळवल्यानंतर मुख्यमंत्रीपदाचे ते सर्वात प्रबळ दावेदार मानले जात आहेत.

## एआयएडीएमके-डीएमके यांचे सरकार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** एआयएडीएमके आणि डीएमके यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन करण्याचा दावा केल्यास टीव्हीकेचे १०७ आमदार सामूहिक राजीनामा देतील, अशा चर्चांना टीव्हीकेने स्पष्ट शब्दांत फेटाळून लावले आहे. पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अशा कोणत्याही निर्णयावर पक्षात चर्चा झालेली नाही.

टीव्हीकेच्या एका वरिष्ठ नेत्याने सांगितले की, पक्ष सध्या सरकार स्थापनेसाठी उपलब्ध शक्यतांचा आढावा घेत आहे. "सध्या आम्ही दोन पर्यायांवर विचार करत आहोत. व्हीसीके, सीपीआय आणि सीपीएम या पक्षांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे. या पक्षांच्या एकत्रित सहा जागांच्या पाठिंब्यामुळे आम्हाला ११८ चा बहुमताचा आकडा गाठता येईल. त्याचबरोबर, राज्यपालांनी शपथविधीस परवानगी द्यावी आणि विधानसभेत बहुमत सिद्ध करण्याची संधी द्यावी, यासाठी न्यायालयात जाण्याचाही पर्याय तपासला जात आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

सामूहिक राजीनाम्यांच्या चर्चांबाबत बोलताना ते म्हणाले, "या अफवा पूर्णपणे निराधार आहेत. जनतेने आम्हाला स्पष्ट कौल दिलेला असताना आम्ही १०८ जागांवरून राजीनामे देऊन पुन्हा निवडणूक का लढवू?" टीव्हीकेकडे स्वतःचे १०७ आमदार आहेत. काँग्रेसने आपल्या पाच आमदारांचा पाठिंबा जाहीर केल्यानंतर संख्या ११२ वर पोहोचली आहे. डावे पक्ष आणि व्हीसीके यांनी पाठिंब्याबाबत उच्चस्तरीय बैठका सुरू केल्या आहेत.

## ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर सरकारी तेल विपणन कंपन्यांना भुर्दंड

# दर स्थिर ठेवण्यासाठी तेल कंपन्यांना ३० हजारांचा फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर भारतातील सरकारी तेल विपणन कंपन्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किरकोळ किमती न वाढवता अखंड पुरवठा सुरू ठेवल्याने इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपन्यांना मार्चच्या मध्यापासून सुमारे ३० हजार कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.




पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतुकीतील अडथळ्यांमुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी उसळी आली.

उत्पादन खर्चात ५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली असतानाही सरकारी कंपन्यांनी पेट्रोल, डिझेल, एलपीजी, एव्हिएशन टर्बाइन इंधन आणि इतर पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा सुरळीत ठेवला. वाढती मागणी, जहाजांच्या मार्गातील बदल, वाढलेले विमा हप्ते आणि अतिरिक्त वाहतूक खर्च यामुळे कंपन्यांवर प्रचंड आर्थिक ताण निर्माण झाला.

२८ फेब्रुवारीपूर्वी ब्रेंट क्रूडची किंमत प्रति बॅरल सुमारे ७२ डॉलर होती. मात्र अमेरिका आणि इस्रायलच्या इराणवरील हल्ल्यानंतर पश्चिम आशियातील तणाव वाढत गेला. त्यानंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतील हालचालींवर निर्बंध आणल्याने ब्रेंट क्रूडचे दर एका टप्प्यावर १४४ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचले. त्यामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली.

सरकारने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात केली. पेट्रोलवरील विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क १३ रुपयांवरून ३ रुपये प्रति लिटर करण्यात आले, तर डिझेलवरील शुल्क पूर्णपणे हटवण्यात आले. ही कपात झाली नसती तर सरकारी तेल कंपन्यांचा तोटा सुमारे ६२,५०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असता, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

एप्रिल महिन्यात पेट्रोलवर प्रति लिटर सुमारे १८ रुपये आणि डिझेलवर २५ रुपये इतकी तूट कंपन्यांना सहन करावी लागत होती. त्यामुळे दररोज सरासरी ६०० ते ७०० कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

या आर्थिक दबावानंतरही देशभरात इंधन व एलपीजीचा पुरवठा अखंडित ठेवण्यात आला. भारताने अनेक देशांप्रमाणे इंधनाचे रेशनिंग किंवा दरवाढीचा मार्ग स्वीकारला नाही. स्पेनमध्ये पेट्रोलचे दर सुमारे ३४ टक्क्यांनी, जपान, इटली आणि इस्रायलमध्ये ३० टक्क्यांनी, जर्मनीमध्ये २७ टक्क्यांनी तर ब्रिटनमध्ये २२ टक्क्यांनी वाढले आहेत. भारतात मात्र पेट्रोलचे दर प्रति लिटर ९४.७७ रुपये आणि डिझेलचे दर ८७.६७ रुपये कायम ठेवण्यात आले आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमतींचा ताण दीर्घकाळ कायम राहिल्यास तेल कंपन्यांच्या खेळत्या भांडवलावर आणि भांडवली गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो. तरीही ऊर्जा सुरक्षा, इथेनॉल मिश्रण, जैवइंधन आणि रिफायनरी विस्तार यांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांना सरकारचा पाठिंबा सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.